# शोभिवंत कण्हेरी ठरेल शेतकऱ्याला वरदान



**प्रा. भूषण तायडे**
(मो.नं. ९७६६८०८३२४)
फुलशेती व लॅन्डस्केपिंग विभाग,
क.का. वाघ उद्यानविद्या
महाविद्यालय, नाशिक



कण्हेरीची अभिवृद्धी प्रामुख्याने फाटे कलम लावून केली जाते. त्यासाठी जून- जुलै महिन्यात उत्तम जातीच्या रसदार, १५ ते २० सें.मी. लांबीच्या काड्या काढून त्या गादी वाफ्यावर लावाव्यात. गादी वाफे तयार करण्यापूर्वी जमिनीत चांगले कुजलेले शेणखत मिसळावे. नंतर २ x १ मी. आकाराचे गादीवाफे तयार करावे. फाटे कलम गादी वाफ्यावर लावल्यानंतर लगेच पाणी द्यावे. फाटे कलमांना इंडोल ब्युटिरिक ॲसिड या संजीवकाचा वापर केल्यास मुळे लवकर फुटतात.

कण्हेरीच्या फुलझाडाला पांढऱ्या, गुलाबी, लाल रंगाची फुले येतात. महाराष्ट्रात कण्हेरीची व्यापारी तत्त्वावर लागवड आढळून येत नाही. परंतु ओसाड माळरानात, जंगलात, बांधाच्या अथवा रस्त्याच्या कडेने कण्हेरीची झाडे उंच वाढलेली दिसतात. कण्हेरीच्या फुलांच्या आकर्षक रंगामुळे ही लोकप्रिय आहेत.

कण्हेरीची फुले वर्षभर उपलब्ध होतात. कण्हेरीचे झाड वर्षभर फुलत असल्यामुळे धार्मिक स्थळांच्या सभोवती, सार्वजनिक उद्यानात कण्हेरीच्या लागवडीस भरपूर वाव आहे. उन्हाळ्यात जेव्हा फुलांची कमतरता असते आणि बाजारात उपलब्ध असलेलेली फुले अतिशय महाग असतात, अशा वेळी फुलांचा किरकोळ व्यवसाय करणारे व्यापारी कण्हेरीच्या फुलांची मोठ्या प्रमाणावर विक्री करताना दिसतात. अत्यंत कमी भांडवलात घरोघरी फुलांच्या पुड्या पुरविणाऱ्या फुलारी लोकांना पैसे मिळवून देणारे कण्हेरीचे फुलपीक वरदान ठरत आहे.



**क्षेत्र व उत्पादन**

महाराष्ट्रामध्ये कण्हेरीच्या लागवडीखालील क्षेत्राबाबत तसेच उत्पादनाबाबत निश्चित आकडेवारी उपलब्ध नाही. साधारणपणे एका पूर्ण वाढलेल्या कण्हेरीच्या झाडापासून ३ ते ४ किलो फुलांचे उत्पादन दर दोन दिवसांनी मिळू शकते.

**हवामान व जमीन**

महाराष्ट्रामध्ये कोणत्याही परिसरामध्ये लागवड फायदेशीर होऊ शकते. कण्हेरीच्या पिकाला उष्ण व कोरडे हवामान अधिक मानवते. या पिकाच्या व्यापारी लागवडीसाठी हलकी ते मध्यम प्रकारची जमीन उत्तम असते. हलक्या, डोंगराळ जमिनीत लागवड केल्यास झाडे लवकर खराब होतात.

**जाती**

कण्हेरीच्या स्थानिक जातींचीच लागवड सर्वत्र आढळून येते. कण्हेरीच्या एकेरी, दुहेरी आणि तिहेरी, पांढऱ्या, गुलाबी तसेच रक्तपर्णी रंगांच्या स्थानिक जाती जास्त लोकप्रिय आहेत.

**अभिवृद्धी**

कण्हेरीची अभिवृद्धी प्रामुख्याने फाटे कलम लावून केली जाते. त्यासाठी जून– जुलै महिन्यात उत्तम जातीच्या रसदार, १५ ते २० सें.मी. लांबीच्या काड्या काढून त्या गादी वाफ्यावर लावाव्यात. गादी वाफे तयार करण्यापूर्वी जमिनीत चांगले कुजलेले शेणखत मिसळावे. नंतर २ x १ मी. आकाराचे गादीवाफे तयार करावे. फाटे कलम गादी वाफ्यावर लावल्यानंतर लगेच पाणी द्यावे. फाटे कलमांना इंडोल ब्युटिरिक ॲसिड या संजीवकाचा वापर केल्यास मुळे लवकर फुटतात.

**लागवड**

पाण्याची सोय उपलब्ध असल्यास कण्हेरीची लागवड वर्षभरात कधीही करता येते. परंतु पावसाळ्यात लागवड केलेली कलमे वातावरणातील आर्द्रतेमुळे लवकर रुजतात. कण्हेरीचे झाड झुडुपासारखे २ ते २.५ मी. वाढते. फांद्या उभट वाढतात. त्यामुळे ३ x ३ मी. किंवा ४ x ४ मी. अंतरावर लागवड करावी.

**छाटणी**

कण्हेरीच्या झाडाला अधिक फांद्या येण्यासाठी झाडाची छाटणी करणे अत्यंत आवश्यक आहे. उन्हाळ्यामध्ये जाड आकाराच्या फांद्या तोडून टाकल्यास नवीन फांद्या फुटून भरपूर फुले येतात. तसेच वाळलेल्या फांद्यासुद्धा वेळोवेळी काढून टाकाव्यात.

**खत व पाणी**

कण्हेरीच्या रोपांची लागवड करताना खड्ड्यात एक घमेले कुजलेले शेणखत टाकावे. त्यानंतर झाड एक वर्षाचे झाल्यानंतर दरवर्षी प्रत्येक झाडाला पावसाळ्याच्या सुरवातीला १०० ग्रॅम नत्र व १०० ग्रॅम स्फुरद बांगडी पद्धतीने द्यावे. कण्हेरीच्या झाडाला उन्हाळ्यामध्ये ३ ते ४ दिवसांनी तर हिवाळ्यात १० ते १२ दिवसांच्या अंतराने पाणी द्यावे. उन्हाळ्यात पाण्याचा ताण पडू देऊ नये.

**फुलांची काढणी**

कण्हेरीची लागवड केल्यानंतर एक ते दोन महिन्यात फुले येण्यास सुरवात होते. परंतु लागवडीनंतर २ ते ३ वर्षांनी व्यापारी उत्पादन सुरू होते. कण्हेरीच्या पूर्ण वाढलेल्या एका झाडापासून दर एक दिवसाआड साधारणपणे ३ ते ४ किलो फुले मिळतात. ■